# गुरुजींच्या गोष्टी व इतर कथा

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**गुरुजींच्या गोष्टी व इतर कथा : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये १२०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## अनुक्रमणिका

- गुरुजींच्या गोष्टी /५
- चंद्रोदय /२५
- उमाळा /६१
- छात्रालय /८९
- मुलांसाठी फुले /१०९

✦✦

# गुरुजींच्या गोष्टी

# परमेश्वर काही मूर्ख नाही

फार प्राचीन काळची गोष्ट आहे. एक दिवस एका ऋषीच्या मनात ईश्वराच्या सर्वज्ञत्वाविषयी व व्यवहारज्ञानाविषयी जबरदस्त शंका उत्पन्न झाली. या ऋषीचे नाव गृत्समद. गृत्समद हा विद्वान होता, विचारी होता; त्याचे स्वत:चे असे आचरणही धुतलेल्या तांदळासारखे होते; आरशाप्रमाणे निर्मळ त्याचे डोळे होते. लांब शुभ्र दाढी त्याला फारच शोभून दिसे; डोक्यावर जटाभार मिरवत होता. गृत्समदांना राजदरबारी किंवा विद्वत्सभेत मोठा मान असे. अशा थोर गृत्समदांच्या मनात ईश्वराच्या शहाणपणाबद्दल शंका यावी हे जरा चमत्कारिक नाही का? आपण काय ईश्वरापेक्षा शहाणे आहोत, त्याच्यापेक्षा का आपणास जास्त समजते? ज्याने हे अफाट विश्व निर्माण केले, ज्याने पर्वतांना स्थिर केले, वनांना निर्माण केले, हे अखंड निळे आकाश रत्नरचित असे वरती पसरून ठेवले, ज्याने कोट्यवधी जीवजंतू नाना प्रकारचे निर्माण केले त्या ईश्वराच्या कृतीबद्दल आपण शंका घ्यावी हे चांगले का? चांगले जरी नसले तरी एखादे वेळेस आपल्या वडील माणसाच्या कृतीबद्दल जशी आपणास शंका येते, तशी ईश्वराबद्दलही आली म्हणून काही वावगे नाही. आपण आलेली शंका फेडून घ्यावी. मनात संशयग्रस्त राहणे हे योग्य नाही. संशयात्मा विनश्यति ! ज्याप्रमाणे धुक्यामध्ये सापडलेले गलबत मार्ग कोणता या शंकेने नाश पावते, तसेच संशयाच्या धुक्यामध्ये मनुष्यप्राण्याचे होते. गृत्समदांच्या मनात ईश्वराच्या चातुर्याबद्दल कोणती शंका निर्माण झाली होती?

परमेश्वराची ब्रह्मा, शिव व विष्णू ही तीन स्वरूपे आपण कल्पिलेली आहेत. ब्रह्मा म्हणजे सृष्टी उत्पन्न करणारी शक्ती, विष्णू म्हणजे सृष्टी संरक्षण करणारी शक्ती, शिव म्हणजे सृष्टीचा संहार करणारी शक्ती. एकाच ईश्वराला ही तीन नावे

निरनिराळ्या नात्याने आपण देतो. जसे, एकच मनुष्य चित्रे काढील तर आपण त्यास चितारी म्हणतो; तोच मनुष्य शाळेत शिकवीत असेल तर त्याला शिक्षक म्हणतो; त्यानेच एखादे वेळेस कीर्तन वगैरे केले तर त्यास कीर्तनकार म्हणतो– तरी व्यक्ती एकच असते. व्यक्तीने जे निरनिराळे वेळी निरनिराळे उद्योग केले त्यावरून आपण त्याच वेळी त्याच व्यक्तीला भिन्न भिन्न संज्ञा दिल्या, परंतु व्यक्ती एकच– तीच. त्याप्रमाणे ईश्वर एकच, परंतु जेव्हा तो सृष्टी उत्पन्न करण्याचे काम करतो त्यावेळेस आपण त्याला ब्रह्मा म्हणतो, ज्यावेळेस सृष्टीचे संरक्षण करण्याच्या कामाच्या खुर्चीवर तो बसतो तेव्हा त्याला विष्णू म्हणतो, सृष्टी संहार करण्याचे काम करू लागताच त्याला रुद्र किंवा शंकर म्हणतो. तिन्ही रूपे एकाच परमेश्वराची.

असा जो हा त्रिविध परमेश्वर आहे तो कधी ब्रह्मा किंवा शिव या नात्याने अनेक चुका करताना आढळतो. पुराणात आपण अनेक गोष्टी वाचतो. कोणी राक्षसाने तपश्चर्या केली, घोर तपश्चर्या केली त्याला ब्रह्मदेवाने किंवा शंकराने वर दिला. उदाहरणार्थ, रावणाला ब्रह्मदेवाने अनेक वर दिले; भस्मासुराला असेच वर देण्यात आले होते; हिरण्यकशिपू याला असेच वर देण्यात आले होते; सिंदुरासुराला असेच वर देण्यात आले होते; निरनिराळ्या या लोकांना ईश्वराने वर दिले व या वराचा उपयोग त्या सर्वांनी वाईट रीतीने केला. भस्मासुराला शंकरांनी वर दिला की तू ज्याचे डोक्यावर हात ठेवशील तो मरण पावेल; हिरण्यकशिपू याला ब्रह्मदेवाने वर दिला की तू कोणा माणसाकडून किंवा पशूकडून रात्री किंवा दिवसा, घरात किंवा बाहेर, सजीव किंवा निर्जीव अस्त्राने, मारला जाणार नाहीस! यांनी असे वर घेतले परंतु दुरुपयोग केला. भस्मासुर तर ज्याने वर दिला त्या शंकरांचेच डोक्यावर हात ठेवायला धावला! वर खरा आहे की खोटा आहे हे इतर कोठे पाहण्यापेक्षा तुमच्याच बाबतीत आधी पाहतो असे म्हणून भस्मासुर शंकरावर धावून गेला व शंकर हातात डमरू घेऊन पळत सुटले! शेवटी मोहिनीचे रूप घेऊन– तिलोत्तमेचे रूप घेऊन युक्तीने जगाचे संरक्षण करणाऱ्या विष्णूला भस्मासुराचे पारिपत्य करणे भाग पडले; हिरण्यकशिपूलाही नरसिंह हे ना धड मनुष्य आहे ना धड पशू असे रूप घेऊन, दिवसा किंवा रात्री नको म्हणून सायंकाळी, सजीव निर्जीवाने नको म्हणून नखांनी, घरात किंवा बाहेर नको म्हणून उंबऱ्यावर, जमिनीवर नको म्हणून मांडीवर घेऊन मारणे विष्णूला भाग पडले.

ब्रह्मदेव व शंकर यांनी चुका कराव्या व त्या निस्तरणे विष्णूला भाग पडे. जसे छात्रालय दैनिकाच्या चुकांचे प्रायश्चित्त छात्रालयाच्या चालकांना भोगावे लागते!



आपण काय करतो याचा विचार या ब्रह्मदेव-शंकराच्या मनात येत नसे का? त्यांना स्वत:च्या कृत्याचे परिणाम का आजमावता येत नसत? ते जर परमेश्वर होते, ते जर त्रिकालज्ञ सर्वज्ञ होते, तर हे राक्षस या वरांचा दुरुपयोग करतील हे त्यांना कसे समजून आले नाही? बरे, एकदा नाही दोनदा नाही पुन:पुन्हा या अशा चुका ब्रह्मादी देवांनी केल्या. पुन:पुन्हा त्यांनी असे भरमसाट वर, जे जे मागण्यात आले ते ते दिले. गृत्समदाला हीच शंका आली होती. हे ब्रह्मदेव, हे शंकर अगदी वेडे आहेत, त्यांना तारतम्य नाही, असे गृत्समदाला वाटले. पुन:पुन्हा त्याच चुका करणाऱ्या या देवांना काय म्हणावे हे गृत्समदास समजेना. मनुष्य सुद्धा जर विचारी असेल तर तीच चूक पुन्हा करीत नाही. जर आपण एखाद्याला मदत दिली आणि त्या मदतीचा उपयोग तो दुष्ट कृत्यासाठी करीत आहे असे दिसले तर आपण त्याला पुन्हा मदत करणार नाही, किंवा दुसऱ्या कोणास करतेवेळी सावध राहू. एकदा ठेच लागली म्हणजे त्या मार्गाने आपण सावधगिरीने जातो; परंतु हे आमचे चार तोंडांचे वेदज्ञ ब्रह्मदेव व हे कैलासनिवासी महादेव यांना हा विचार कसा येत नाही? पूर्वीच्या चुका ते पुन्हा कशा करतात? ते मूर्ख व भोळे आहेत का? शंकरांना तर भोळा सांब असे नाव जगातील लोकांनी ठेवून सुद्धा दिले. जगताचे, सर्व विश्वाचे व्यवहार ज्यांना चालवायचे त्यांनी दक्ष व जागरूक राहिले पाहिजे; भोळेपणा पत्करून कसे चालेल?

गृत्समदास ही शंका आली. या शंकेचे निरसन प्रत्यक्ष ब्रह्मदेव व शंकर यांच्याकडेच जाऊन करावे असे त्यांना वाटले. प्रत्यक्ष त्यांनाच स्पष्टपणे जाऊन विचारावे व संशयनिरास करून घ्यावा असे ठरवून गृत्समद हे प्रथम शंकराकडे जावयास निघाले. तप:सामर्थ्याने गृत्समदास एकदम कोठेही जाता येत असे. ते एका क्षणात कैलासास येऊन दाखल झाले.

कैलासावर आज कोण गर्दी होती. आज कैलास सजवला होता. शिंगे– डमरू वाजत होते. आज काय बरे होते? आज कैलास पर्वतावर सर्व देवांची सभा होती व प्रत्यक्ष विद्यासागर गणपती यांचे नृत्य होते. शंकरांनी गणपतीस सांगितले, माझ्याजवळ जी नर्तनकला शिकलास त्याची परीक्षा दे. मी सर्व तेहतीस कोटी देव बोलावणार आहे. तो दिवस आज होता. कैलास पर्वतावर शेकडो विमानांची आज गर्दी होती. त्या शुभ्रधवल कैलास पर्वतावर ती भृंगरुचि विमाने फारच खुलून दिसत होती. भगवान् पशुपती सर्वांचे स्वागत करीत होते. नंदिकेश्वर, शृंगी, भृंगी, रिटी, तुंडी वगैरे शंकराचे भृत्य कामात गर्क होते. एकच गर्दी उसळली होती.